महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in


जा.क्रः तंशिविकापु/आस्था-३(अ)/घरबांधणी/२०२४/ 2238 दिनांक : 31 MAY 2024

**अतितात्काळ**

प्रति,

सचिव/प्राचार्य,
कुलसचिव सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे.
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड/अवसरी
शासकीय तंत्रनिकेतन,कोल्हापूर/मिरज/कराड/अवसरी/तासगांव/सोलापूर/पुणे.
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,कराड
शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन,पुणे.
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, पुणे.
महाराष्ट्र राज्य इन्स्टि. ऑफ हॉटेल मॅनेजमेन्ट ॲन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी पुणे.

**विषय :- घरबांधणी अग्रिमाबाबतची कागदपत्रे सादर करणेबाबत..**

संदर्भ :-१) सचांलनालयाचा दि. २८/०५/२०२४ रोजीचा ईमेल.
२) या कार्यालयाचे परिपत्रक तंशिविकापु/आस्था-३अ/घरबांधणी/२०२४/१८४४, दिनांक २९/०४/२०२४.

उपरोक्त संदर्भित विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील सन २०२१-२०२२, २०२२-२०२३ व २०२३-२०२४ या कालावधीमध्ये ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रिम मंजूर झालेले आहे. अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांचे अग्रिम ज्या प्रयोजनाकरिता मंजूर झालेले आहे त्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र तसेच ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी जागेवर घर बांधलेले आहे. अशा कर्मचाऱ्यांनी महानगरपालिका, नगरपालिकेचे Completion Certificate, तसेच ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी बॅंकेकडून कर्ज घेतलेले आहे अशा कर्मचाऱ्यांनी बॅंकेचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणेबाबत सूचित केले होते. तथापि सदरची माहिती अद्याप या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

तरी सदरची **माहिती दिनांक ०१/०६/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यत** या कार्यालयास त्वरीत सादर करण्यात यावी. सदरची माहिती महालेखापाल कार्यालयास सादर करण्यास विलंब झाल्यास त्यास सर्वस्वी आपण जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. तसेच सदर माहिती व कागदपत्रे **est.ropune@gmail.com** या ई-मेल आयडीवर पाठविण्यात यावी.

**सोबत : संचालनालयाचे पत्र.**

(म.रा.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महा-पालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk१६@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: ttp://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

File No.: DTEM-D१६/८४/२०२४-DESK१६

प्रति,
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर

**विषय : घरबांधणी अग्रिमा बाबतची कागदपत्रे सादर करण्याबाबत.**
**संदर्भ :** या संचालनालयाचे पत्र क्र. DTEM-D16/75/2024-DESK16, दिनांक २४/०४/२०२४

उपरोक्त विषयानुसार महालेखापाल कार्यालयातील अधिकाऱ्यांनी केलेल्या लेखापरिक्षण अन्वये सन २०२१-२०२२, २०२२ - २०२३ व २०२३ - २०२४ या कालावधी मधील ज्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रिम घेतलेले आहे. अश्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे अग्रिम ज्या प्रयोजनाकरिता मंजूर केलेले आहे. त्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र आपल्या अधिपत्या खालील संस्थेची एकत्रित माहिती सादर करण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.

परंतू अद्यापही काही विभागीय कार्यालयांनी संबंधित विनियोग प्रमाणपत्र सादर केलेले नाही. ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी जागेवर घर बांधलेले आहे. अश्या अधिकारी / कर्मचारी यांना महानगर पालिका, नगरपालिकेचे Completion Certificate सादर करावे. तसेच ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी बँकेकडून कर्ज घेतलेले आहे अश्यानी बँकेचे कर्ज परतफेड केले असल्यास बँकेचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

सदर प्रमाणपत्र दिनांक ०१/०६/२०२४ पर्यंत संचालनालयास सादर करावे अन्यथा महालेखापाल कार्यालयास संबंधित माहिती विलंबाने सादर झाल्यास आपण जबाबदार रहाल हयाची नोंद घेण्यात यावी.

Signed by
Sunil Sukhadeo Bhamare
Date: 28-05-2024 18:29:26

( डॉ. सुनिल भामरे )
सहसंचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.